# गणपती खेळांचाही 'अधिपती'

क्रीडा विश्वातून



सुनील वालावलकर
क्रीडा संघटक

**गणेशोत्सव हा श्रद्धा, संस्कृती व सामाजिक परिवर्तनाचा संगम आहे. गजाननाच्या मूर्तींच्या स्वरूपात झालेल्या बदलांतून जीवनपद्धतीचे प्रतिबिंब दिसते. प्राचीन काळी परशु, त्रिशूल, भाला यांसारख्या शस्त्रांनी सजलेल्या मूर्ती आपले संरक्षण दर्शवत होत्या. मात्र आता आरोग्य व जीवनशैलीशी निगडित आजार हेच राक्षस ठरले आहेत. त्यामुळे व्यायाम आणि खेळ हेच आधुनिक शस्त्र झाले आहेत. खेळांच्या साहित्याला गजाननाच्या हाती दाखविल्यास श्रद्धा आणि क्रीडा यांचा सुंदर संगम साधता येईल आणि बाप्पा आरोग्याचा रक्षक म्हणूनही अधोरेखित होईल.**

**मंगलमूर्ती गणरायाच्या** आगमनामुळे संपूर्ण देशभरात सध्या उत्साहाचे वातावरण भरून राहिले आहे.

वेद-पुराणकाळापासून श्रद्धेच्या स्थानी असलेल्या गजाननाच्या बाह्य स्वरूपात कालौघात रूपबदल होत गेले आहेत. याचा पुरावा म्हणजे, अष्ट विनायकांच्या मूर्ती. सध्या आपण ज्या गणेशरूपाचे पूजन करतो, त्या रूपात आणि अष्टविनायकांच्या रूपांत रुढार्थाने कसलेच साम्य नाही. याबाबतीत अधिक माहिती देताना लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. मुकुंद कुळे म्हणतात की, 'गणपती या देवतेचा आतापर्यंतचा प्रवास सामाजिक-सांस्कृतिक अभिसरणाचा असल्यामुळे समाज जसा बदलतो, त्यानुसार या देवतेचे स्वरूप बदलत गेलेले दिसते. नेमक्या याच कारणामुळे गणपतीविषयीचे आकर्षण पिढ्यांपिढ्या वाढतच गेले.'

पुरातन काळापासून श्रीगजाननाला लोकांचे प्रेम लाभत आले आहे. यामध्ये मूर्तिकारांचा हातभारही आहे. चित्रकार आणि शिल्पकारांच्या प्रतिभेला सतत ऊर्जा देणाऱ्या गणपती बाप्पाच्या नानाविध सुंदर मूर्ती मूर्तिकारांनी घडविल्या आणि त्यामुळे बाप्पाचे स्थान समाजात अधिकच घट्ट होत गेले. जोडीला गणपती ही आपली संरक्षक-देवता असल्याची श्रद्धा खूप खोलवर रुजली असल्यामुळे मूर्तिकारांनी विघ्नहर्त्याच्या भुजांमध्ये शस्त्र-अस्त्रांची स्थापना केली. पुरातन काळी जी प्रचलित शस्त्रे होती, उदा. परशु, भाला, सुदर्शन चक्र, त्रिशूल इ. शस्त्रांनी युक्त अशी गणेशाची मूर्ती मूर्तिकारांच्या प्रतिभेतून साकार झाली. दुष्ट प्रवृत्तीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी एकदंतावर असल्यामुळे त्याच्या प्रत्येक मूर्तीच्या हातामध्ये विविध प्रकारची शस्त्रे बघायला मिळतात.

पुरातन काळातील असुर-राक्षसांशी लढण्यासाठी प्राचीन-मध्ययुगीन शस्त्रे कदाचित योग्य असतीलही, परंतु आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात शत्रूचा बीमोड करण्यासाठी परशु, भाला, त्रिशुल यांसारखी कालबाह्य शस्त्रांची आवश्यकता नाही. सध्याच्या काळात ज्याप्रमाणे लढायांचे स्वरूप बदलले आहे, त्याचप्रमाणे शस्त्रांचे आणि शत्रूचे स्वरूपही बदलले आहे. माझ्या मते, विविध आजारांच्या रूपातील सध्याचे राक्षस प्रत्येकाच्या शरीरात ठाण मांडून बसले आहेत.

एआय इमेज



बदलत्या जीवनशैलीमुळे बहुसंख्य जनतेच्या शरीरात मधुमेह, रक्तदाब आणि विविध मानसिक आजारांनी प्रवेश केला आहे. अशा आजाररूपी राक्षसांवर विजय मिळवायचा झाल्यास प्रत्येक व्यक्तीने किमान एक खेळ दररोज खेळणे आवश्यक झाले आहे.

संपूर्ण शरीराला व्यायाम घडविण्याची क्षमता मैदानी खेळांमध्ये असते. योग्य हृदयभिसरण आणि वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी मैदानी खेळाचा खूप उपयोग होतो. त्यासाठी क्रीडा-साहित्य हीच आधुनिक शस्त्रे असणार आहेत. म्हणून, खेळांची आयुधे श्रीगजाननाच्या हाती दाखविल्यास क्रीडा उपक्रमांना श्रद्धेचा सन्मान मिळू शकेल आणि सातत्य टिकून राहील. मध्ययुगीन शस्त्र विध्वंसक होती. त्याउलट क्रीडा-साहित्य सामान्यांच्या आरोग्याला वरदान ठरणारी आहेत. खेळांच्या रॅकेट्स, बॅट्स, पॅडल्स, स्टिक्स हे साहित्यसुद्धा शस्त्रेच आहेत; परंतु यामुळे आनंदाचा आणि आरोग्याचा प्रसार होतो. म्हणून ज्याप्रकारे गजाननाच्या बाह्यमूर्तीमध्ये काळानुसार बदल होत गेले, त्याच धर्तीवर त्याच्या हातामधल्या शस्त्रांची जागा खेळाच्या साहित्याने घेतली पाहिजे. अशाप्रकारे, गणपती हा आपल्या आरोग्याचासुद्धा संरक्षक आहे, असा संदेश अधोरेखित करता येईल.

कलावंतांसाठी श्रीगणेश श्रद्धास्थानी आहेच, जोडीला क्रीडापटूंसाठीसुद्धा विनायक क्रीडापती झाल्यास खेळांची व्याप्ती वाढीस लागू शकेल !